# मुंबई विद्यापीठ

परीक्षा विभाग
निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.


क्र.परीक्षा / निकाल कक्ष /२६२८/ २०१७

परिपत्रक :–

प्रमुख / संचालक, वाणिज्य विभाग, मुंबई विद्यापीठ प्राचार्य / सचालक, विद्यापीठाशी संलग्नीत असलेले वाणिज्य विद्याशाखेतील पदव्युत्तर पदवी शिक्षणकम चालविणारी महाविद्यालयाचे प्राचार्य, व सहाय्यक कुलसचिव रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र यांना सुचित करण्यात येते की, M.Com(Sem-१,२,३ व ४) (CBSGS)नोव्हेंबर,२०१७, M.Com(Sem-१,२ व ३)(CBCSGS)(Choice Base) द्वितीय सत्र २०१७ मध्ये घेण्यात येणा–या परीक्षा प्रवेश अर्ज Online या वेब लिंक वरून muexam.in स्विकारण्यात येणार आहे:– त्याचा तपशिल खालिलप्रमाणे आहेत.

| अ. क. | परीक्षा | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|---|
| 1. | **M.Com (Sem-2&4) (CBSGS) & M.Com (Sem2) (CBCSGS) (CHOICE BASE)** | नियमित शुल्क | ३१/१०/२०१७ ते ०५/११/२०१७ | ०६/११/२०१७ |
| | | विलंब शुल्क रू. 100/– सहित | ०६/११/२०१७ ते ०८/११/२०१७ | ०९/११/२०१७ |
| | | अतिविलंब शुल्क रू. 500/– सहित | ०९/११/२०१७ ते ११/११/२०१७ | १३/११/२०१७ |
| 2. | **M.Com (Sem-1&3) (CBSGS) & M.Com (Sem1&3)(CBCSGS) (CHOICE BASE)** | नियमित शुल्क | ०२/११/२०१७ ते १०/११/२०१७ | १३/११/२०१७ |
| | | विलंब शुल्क रू. 100/– सहित | ११/११/२०१७ ते १७/११/२०१७ | १८/११/२०१७ |
| | | अतिविलंब शुल्क रू. 500/– सहित | १८/११/२०१७ ते २३/११/२०१७ | २४/११/२०१७ |

ता.क. M.Com (Sem-IV) परीक्षेचे अर्ज सादर करताना विद्यापीठ अद्यादेश क. 0.5982 यांचे तंतोतंत पालन करावे. विद्यापीठ अद्यादेश कमांक 0.5982 खालीलप्रमाणे :–

"0.5982 : However no learner will be allowed to appear for Sem.IV examination unless he/she has passed all the course of Sem.I&II examination previously".

उपरोक्त अद्यादेशाचे उल्लंघन करून एखाद्या विद्यार्थ्याचा अर्ज विद्यापीठास सादर केल्यास यामुळे भविष्यात काही कायदेशीर न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची असेल याची नोंद घ्यावी.

वर नमुद केलेल्या तारखांचा तपशिलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमुद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वर online भरून ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर अर्जासोबत विद्यार्थ्यांचे मागील सत्रांचे / परीक्षांचे गुणपत्रिकाच्या छायांकीत गुणपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे. प्रती जोडून हे अर्ज Form submission report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना हया अर्जाचे सत्र निहाय असे गठ्ठे बांधूनच विद्यापीठात जमा करावे, जेणेकरून हया अर्जाची छाणणी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी रात्री 12.00 वाजता M.Com. (Sem II & IV) CBSGS & M.Com (Sem. II) (Choice Based) आणि M.Com. (Sem I & III) CBSGS & M.Com (Sem. III) (Choice Based) Inword Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थितीत वाढवून दिली जाणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

तसेच विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशअर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे स्वाक्षरी, नांव (English, Marathi) माध्यम, परीक्षा केंद्र व विषय इ. बाबी बरोबर आहेत याची खात्री करून घ्यावी. परीक्षा अर्ज Inward झाल्यावर वरील कोणतीही दुरुस्ती करता येणार नाही, याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

# मुंबई विद्यापीठ



जे विद्यार्थी प्रथम सत्र 2017 च्या एम. कॉम सत्र 1 व 2 च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तिर्ण झाले असतील व त्यानी पुनर्मुल्यांकनासाठी विद्यापीठाकडे अर्ज सादर केला असेल अशा विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र 2017 मध्ये होणा–या एम.कॉम. सत्र 4 या परीक्षांसाठी परीक्षा प्रवेश अर्ज (Provisional Basis) व त्याच्या पुनर्मुल्याकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच परिपत्रक जाहिर केल्यापासून विहित शुल्कासहित सादर करावेत तसेच फेरतपासणी / पुनर्मुल्यांकनाच्या प्रकियेत संबंधीत विद्यार्थी एम.कॉम. सत्र 1 किंवा 2 मध्ये पुन्हा अनुत्तीर्ण झाल्यास त्यांचा एम.कॉम सत्र 4 या परीक्षेचा निकाल रददबाद(ADC) करण्यात येईल अशा प्रकारचे हमी पत्र महाविद्यालयाने संबधीत विद्यार्थ्याकडुन घेतल्यानतरच सदर विद्यार्थ्यांचा एम.कॉम. सत्र 4 चा परीक्षा अर्ज विद्यापीठास सादर करावा अशा विद्यार्थ्यांची सपुर्ण जबाबदारी महाविद्यालयाकडे राहिल तसेच अशा विद्यार्थ्यांची वेगळी यादी महाविद्यालयाने विद्यापीठास सादर करावी जेणे करून परीक्षा प्रवेश पत्र (Hall Ticket) देण्याचे सोईचे होईल.

जे विद्यार्थी श्रेणी सुधारणीसाठी (Grade Improvement) अर्ज करणार आहेत त्यांनी प्रचलित पध्दतीनुसार (Hard Copy) परीक्षा प्रवेश अर्ज भरून त्यासोबत सर्व (Sem. I, II, III & IV) सत्राच्या उत्तीर्ण गुणपत्रिकांच्या छायांकित प्रती जोडुन वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र Online पध्दतीने Inward झाले नाही तर त्या विद्यार्थ्यांने आपले परीक्षा आवेदनपत्र प्रचलित पध्दतीनुसार (Hard Copy) परीक्षा प्रवेश अर्ज भरून वरील तारखांनुसार परीक्षा विभागात सादर करावेत.

तसेच M. Com (Sem. IV) (CBSGS), या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कामध्ये रू.250/– पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी देवनागरी नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्याच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चुक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहिल.

;टिप्पणी :– विद्यार्थी परीक्षा अर्ज mu.ac.in या संकेत स्थळावर जाउन Online भरून त्याची प्रिंट घेउन आवश्यक त्या कागद पत्रासोबत संबधीत महाविद्यालयाच्या कार्यालयास जमा करून परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरणे अनिवार्य आहे यांची नोंद घ्यावी-)

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबधीतांनी नोंद घेउन योग्य ती कार्यवाही करावी.

mu.ac.in.
(Web Link :- mu[redacted].ac.in ---→ examination --→ follow the instructions given on the page)

सही

( प्रा.(डॉ.)अर्जून पी. घाटोळे )
प्र. संचालक
परीक्षा व मुल्यामापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. 30 ऑक्टोंबर, 2017.

---

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य / संचालक

अ.) प्रत माहीतीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषितः–

1. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा केंद्र, परीक्षा विभाग
2. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित व लेखा विभाग
3. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब.) प्रत माहीतीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेतिः–

1. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
2. मा.कुलगुरु याचे कार्यकारी सचिव,मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई–32
3. मा. प्र. कुलगुरु मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्वीय सहायक.

30/10/17

( प्रा.(डॉ.)अर्जून पी. घाटोळे )
प्र. संचालक
परीक्षा व मुल्यामापन मंडळ

स्थळ : मुंबई.
दि. 30 ऑक्टोंबर, 2017.